# कमला महाविद्यालयात श्रद्धा मसवेकरचा सत्कार

**कोल्हापूर :** समाजशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात पहिला क्रमांक मिळवून येथील कमला महाविद्यालयाच्या श्रद्धा रवींद्र मसवेकर हिने 'डॉ. विलास संगवे समाजशास्त्र पारितोषिक' पटकविल्याबद्दल तिचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते गौरव झाला. या वेळी डॉ. पाटील म्हणाले, ''शारीरिक व मानसिक समतोल साधत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जीवनात येणाऱ्या प्रश्नांना सामोरे जावे. एखादे ध्येय गाठण्यासाठी कोणत्याही परिस्थिती नियोजनात्मक पावले उचलण्याची सवय लावून घ्यावी.'' या वेळी प्रा. टी. ए. थोरात, प्रा. ए. एम. साळोखे आदी उपस्थित होते.



**कमला महाविद्यालय :** समाजशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात पहिला क्रमांक मिळवून 'डॉ. विलास संगवे समाजशास्त्र पारितोषिक' पटकविल्याबद्दल श्रद्धा मसवेकर हिचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील. शेजारी प्रा. टी. ए. थोरात व प्रा. ए. एम. साळोखे.

10 डिसें 05 सकाळ

...सर यांनी मानले.. संजय पोवार आदी.

# समाजशास्त्र विषयात श्रद्धा मसवेकर विद्यापीठात प्रथम

**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रद्धा रवींद्र मसवेकर ही समाजशास्त्र विषयात शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम आली आणि डॉ. विलास संगवे समाजशास्त्र पारितोषिकाची ती मानकरी ठरली. कु. श्रद्धा मसवेकरचा प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्राचार्य म्हणाले की, महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींनी तिच्या यशाचे अनुकरण करावे. जीवनात अथक कष्ट, प्रामाणिक प्रयत्न हेच यशाकडे घेऊन जातात म्हणून विद्यार्थिनींनी नियोजनात्मक अभ्यास करावा. त्याचबरोबर शारीरिक व मानसिक विकासाचा समतोल साधून प्रगती करावी.

कु. श्रद्धा मसवेकरला मा. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे प्रोत्साहन तर प्रा. टी. एस. थोरात व प्रा. ए. एम. साळोखे यांचे